Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारतीय महिलांची विविध क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल

**डॉ. जयश्री मधुसूदन नेमाडे,** प्राचार्या, अरुणोदया ज्ञान प्रसारक मंडळ संचालित, महिला महाविद्यालय जळगाव

## भारतीय महिला व त्यांची विविध क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल

## सारांश

आजच्या विज्ञान युगात भारतीय महिलांनी विविध क्षेत्रात अत्यंत यशस्वी वाटचाल केलेली आहे.अशी यशस्वी वाटचाल सर्वच क्षेत्रात प्राचीन काळी सुद्धा तिने केलेली होती. परंतु मनुस्मृति या ग्रंथाच्या लिखाणानंतर मात्र स्त्रियांना अत्यंत दुय्यम दर्जाची वागणूक कुटुंबात व समाजात मिळू लागली. आजपर्यंत सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी जास्त प्रमाणात केलेली आहे. कुटुंबात सांस्कृतिक मूल्य टिकविण्याची सर्वस्वी जबाबदारी स्त्रियांचीच आहे असा समज मध्ययुगीन काळापासून पुरुषांप्रमाणेच महिलांचाही झालेला आहे.कारण गुलामाला गुलाम म्हणून अनंत काळ अशी वागणूक मिळाल्याने गुलामगिरी करण हेच

आपल्या जीवनाचे अंतिम सत्य आहे असं त्याला वाटू लागलं होतं त्यासाठी प्रत्येक देशात क्रांती पुरुष निर्माण झाले व त्यांनी गुलामगिरीच्या जोखडातून मानवाची सुटका केली. त्याचप्रमाणे स्त्रियांनी फक्त घराच्या चौकटीतच राहावं व चुल आणि मुल सांभाळाव हेच त्यांच कार्यक्षेत्र आहे असा समज वर्षानुवर्षे साहित्यातून सुद्धा स्त्रियांचा करून देण्यात आला होता.अत्यंत दुय्यम व क्षुद्र वागणूक त्यात कमालीचे कर्मकांड व अंधश्रद्धा लिखित स्वरूपात पसरविल्या गेल्यामुळे स्त्रियांची समाजातील स्थिती अत्यंत दयनीय अशी झाली होती.मुलगा असलेल्या श्त्रीयांना विशेष मान होता.

त्यामुळे आज जेव्हा शिक्षणामुळे स्त्रीला तिच्या अधिकाराची व स्वातंत्र्याची जाणीव झाली त्यावेळेस अन्याय सहन करणे हा सर्वात मोठा गुन्हा आहे हेही तिला समजलं. जी स्त्री सुशिक्षित होईल व आर्थिक स्वायत्तता मिळवेल ती अन्यायाचे जोखड फेकूनच देणार असे पूर्ण सत्य विधान महात्मा फुलेंनी केले होते. त्याचा प्रत्यय आज आपणास समाजात दिसून येतो महिलांचे प्राचीन काळापासून समाज जीवनात महत्त्वपूर्ण योगदान आहे. '1882 मध्ये प्रसिद्ध झालेल्या ताराबाई शिंदे कृत स्त्री पुरुष तुलना आणि पंडिता रमाबाई यांच्या श्रीधर्मनीती या पुस्तकातून मांडले गेलेले विचार ही महाराष्ट्रातील समाज सुधारण्याच्या संदर्भात पडलेली महत्त्वाची पावली होती.

भारताच्या इतिहासात महिलांचा राजसत्तेत सहभाग होता तसा तो स्वातंत्र्याच्या लढाईतही होता. स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र मिळविण्यासाठी व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री सन्मानासाठी स्त्रियांची भूमिका महत्त्वाची ठरली. आज तर नागरि क्षेत्रात स्त्रीया अधिकारीणी बनून पुढे आल्या आहेत. सामाजिक क्षेत्रातही समाज जागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य त्या करीत आहे. स्वयंरोजगार क्षेत्रातही विविध उद्योगधंद्यात स्वतःच्या क्षमतेनुसार रस घेऊन त्या स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत आहेत . .व्यवसाय अथवा कोणतेही कार्य करताना सुलभपणे कार्य करता येण्यासाठी तिने आपल्या पोशाखातही योग्य बदल केलेला आहे. आपलं व्यक्तिमत्व प्रभावी वाटण्यासाठी विविध विद्याशाखांच ज्ञान ती आत्मसात करीत आहे .स्वसंरक्षणासाठी सुद्धा ती जुडोकराटे सारखे अनेक प्रकारचे प्रशिक्षण घेऊन स्वत:च स्वतःची रक्षक बनत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आहे. लिंगभेद कामाच्या ठिकाणी विसरून ती पूर्ण क्षमतेने तिच्या वाट्याला आलेलं कार्य करीत आहे. स्त्री पुरुष समानता समाजात खऱ्या अर्थाने प्रस्थापित होण्यात स्त्रीचा मोलाचा वाटा आहे

**भारतीय महिला**

यत्र नार्यस्तु पूज्यंते रमन्ते तत्र देवता:

याचा अर्थ जिथे स्त्रियांची पूजा केली जाते, तिथे देवतांचा वास असतो. हे सुभाषित संस्कृतमधे प्रसिद्ध आहे. पण खरेच तशी परिस्थिती आहे का हे पाहणे तेवढेच गरजेचे आहे.

कुटुंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. मात्र, ती आज सुरळीत व सुस्थितीत आहे, असे ठामपणे म्हणता येणार नाही. आजची कुटुंबव्यवस्था विघटनाच्या दिशेने जोराने पाऊल टाकू लागली आहे. भारतातील जवळ जवळ सर्वच क्षेत्रांत सामाजिक जीवनामध्ये कमालीचे औदासिन्य, अनैतिकता, भ्रष्टाचार पहायला मिळतो. आज आपल्याकडेही अनेक कुटुंबांत घटस्फोट, कलह वगैरे होत आहेत. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा परिणाम असल्याची उथळ प्रतिक्रिया काही मंडळी देत असतात. काही लोक याबाबत स्त्रियांना दोषी धरतात. मात्र, असा दोषारोप करण्याच्या आधी याबाबत भारतीय संस्कृतीचे अवलोकन करायला हवे.

आपल्या संस्कृतीमध्ये जे-जे काही चांगले, पवित्र, उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झालेले आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी जास्त प्रमाणात केली आहे; परंतु हे घडत असताना स्त्रियांवर अन्याय झाला आहे. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी आणि सांस्कृतिक मूल्य-संवर्धनासाठी स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणावर त्याग केला आहे. याबाबत पुरुषांचा वाटा नगण्य आहे. स्त्रियांवर जबाबदाऱ्या लादून समाजसंस्कृती संवर्धन करण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर अन्याय झाला आहे. तो त्यांनी सहन केला तरच सांस्कृतिक मूल्ये टिकणार, हे म्हणणे योग्य नाही. स्त्रियांनी अन्याय सहन करण्याचे नाकारले किंवा त्यांनी न्यायाच्या वाटेने जायचे ठरवले तर जी काही सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये कोलमडून पडतील ती खरी मूल्ये नव्हती, हे आपण मान्य केले पाहिजे. कारण तो समाजाच्या एका घटकाने दुसऱ्या घटकाच्या शोषणातून व गुलामगिरीतून मिळवलेला गैरवाजवी सामाजिक फायदा ठरतो. जी स्त्री सुशिक्षित होईल आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे आर्थिक स्वायत्तता मिळवेल, ती अन्यायाचे जोखड फेकूनच देणार हे तर महात्मा फुलेंनी सांगितलेले आहे. जशा जशा स्त्रिया शिकताहेत व आर्थिक स्वायत्तता मिळवत आहेत तिथे तिथे पुरुषी वर्चस्वाचे जोखड फेकले जात आहे. आणि मग पुष्कळदा आपल्याकडेही कुटुंबव्यवस्था मोडून पडताना दिसते.

जी-जी व्यवस्था स्त्रियांच्या त्यागावर व शोषणावर अवलंबून असेल तिथे तिथे अन्याय करणारा घटक पुरुषच असतो, हे स्पष्टच आहे. स्त्रीची बरोबरीची क्षमता मान्य केल्यानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या बरोबरीने उचलण्यासाठी पुरुष कचरत असतील तर ते स्त्रियांचे शोषण करण्याची सवय सोडू शकत नाहीत आणि समान कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यात प्रतिष्ठेच्या कारणांवरून ते लाजत असतील, तर मग पुरुषी अहंकारात आणि बौद्धिक समजुतीतच मोठा दोष आहे, असेच समजावे लागेल. आपली कौटुंबिक संस्कृती टिकवायची असेल आणि या बाबतीत आपल्याला जगात आदर्श निर्माण करायचे असेल, तर पुरुषांनी आत्मपरीक्षण करायला हवे आणि येऊ घातलेल्या विघटनांचे खरे कारण आपण आहोत हे मान्य करायला हवे. त्यानुसार त्यांनी स्वत:मध्ये आवश्यक ते बदल करून मूल्ये जोपासायला हवीत. असे न


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

केल्यास होणाऱ्या परिणामांचा दोष पुरुषांनी स्वत:कडे घेतला पाहिजे. त्यासाठी स्त्रियांना जबाबदार धरू नये.

अशा सर्व सामाजिक चळवळींचे नेतृत्व स्त्रियांकडेच असायला हवे; कारण शोषण कुठे, कसे व किती होते हे शोषितालाच कळू शकते, शोषकाला नव्हे. आणि म्हणून पुष्कळ सामाजिक चळवळीत व सामाजिक क्षेत्रात पुरुषाला न दिसणारे अन्याय स्त्रियांच्या नजरेत स्पष्टपणे भरतात. हा दृष्टिकोनाचाच फरक आहे आणि म्हणून अशी चळवळ स्त्री नेतृत्वाखाली चालावी. परंतु या नेतृत्वाच्या मागे केवळ स्त्रीयांबरोबरच पुरुष अनुयायी असण्यास कोणतीही हरकत नसावी. असे घडले तरच येऊ घातलेल्या कोलाहालात आणि वादळात आपली सांस्कृतिक मूल्ये तग धरतील.

**महिलांची विविध क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल**

**राजकीय क्षेत्र (स्वातंत्र्यापूर्व काळ)**

महिलांचा राजकारणातील सक्रीय भाग हा नेहमीच चर्चेचा विषय आहे.भारतात अगदी आर्यांच्या काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे. ऋग्वेदात महिलांना राजकारणात स्थान असल्याचेही दर्शविले आहे. उपनिषद, पुराणकाळात ते कायम होते. परकीय आक्रमणानंतरही काही स्त्रिया राजकारणात दिसतात. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्रोत्तर काळात अनेक भारतीय स्त्रियांनी अनेक क्षेत्रात आपल्या कामाने ठसा उमटविला आहे. भारताच्या इतिहासात महिलांचा राजसत्तेत जसा सहभाग होता तसा तो स्वातंत्र्याच्या लढाईतही होता. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्यानंतर अनेक महिलांनी राजकारणातील अनेक महत्त्वाची पदे भूषवली आहेत. प्राचीन भारतात अनेक गणराज्ये होती व त्यांचा कारभार स्वतंत्र होता. राजेशाही भोवतीच त्यांचे राजकारण केंद्रित होते. हीच प्रथा नंतरच्या काळातही चालू राहिली. इसवी सन बाराव्या शतकानंतर अधूनमधून राज्यकारभाराची सूत्रे महिलांच्या हाती गेल्याचे आपण पाहतो. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षीच निष्णात लढवय्यी म्हणून रझियाने लौकिक प्राप्त केला.इसवी सन १५२४ ते १५६४ या काळात गोंडवाना संस्थानची महाराणी असलेल्या दुर्गावतीचे नावही इतिहासात कोरले गेले आहे. सोळाव्या शतकातील आणखी एक ठळक नाव म्हणजे चांदबिबी. सतराव्या शतकात प्रत्यक्ष राज्यकारभार न करताही राजकारणाला एकूणच नवी दिशा देणारी राजमाता म्हणून नाव घेतले जाते ते जिजाबाईंचे. जिजाऊंनंतर करवीरवासिनी महाराणी ताराबाईंचे नाव ठळकपणे दिसते. इसवी सन १७६६ ते १७९५ या काळात आपल्या कार्यकर्तृत्वाने झळाळून उठली होती इंदूरची पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर.इसवी सन १७७८ ते १८२९ हा काळ कर्नाटकातील कित्तूरची राणी चन्नम्मा.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांचे योगदान अमूल्य होते. त्यांच्या धैर्य, त्याग आणि बलिदानाने भारताला स्वातंत्र्य मिळवण्यात मोठी भूमिका बजावली. आजही, त्यांची प्रेरणादायी कथा आपल्याला समानता आणि न्यायासाठी लढण्यास प्रेरित करते. राणी लक्ष्मीभाई देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढल्या. १८१७ च्या सुरुवातीला भीमाबाई होळकर यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिल्यापासून भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महिलांचा सहभाग सुरू झाला. मादाम भिकाजी कामा, १८५७ च्या उठावानंतर आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या पहिल्या भारतीय महिला समाजवादी. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्रातील अनेक गांधीवादी महिलांचे योगदान आहे. डॉ. ॲनी बेझंट यांचेही भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महत्वाचे आहे. स्वातंत्र्यासाठी व्यापक, सर्वसमावेशक आणि शाश्वत चळवळ उभारण्यात या महिलांचे योगदान मोलाचे होते. स्वराज्यासाठीच्या चळवळीत जशा अहिंसक


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

सत्याग्रहात हजारो स्त्रिया सामील झाल्या, तशा अनेक स्त्रिया सशस्त्र क्रांतिकारक बनल्या. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची मालिका होती, ज्याचा अंतिम उद्देश भारतातील ब्रिटिश राजवट संपवणे हा होता.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांना सहभागी करुन गांधींनी स्त्रीयांना नागरीक म्हणून आपले कर्तव्ये पार पाडण्याची संधी दिली. बेगम साफिया अब्दुल वाजिद यांनी 'भारत छोडो' आंदोलनासाठी अलाहाबाद विद्यापीठातली आपली प्राध्यापकाची नोकरी सोडली, मादाम भिकाजी कामा यांनी देशाबाहेर भारताला स्वातंत्र्य मिळावे, या विचारांचा प्रसार केला. भारताच्या स्वातंत्र्यापूर्वीचं सर्वांत मोठं आंदोलन म्हणून 'चले जाव'ची नोंद होते. या आंदोलनात असंख्य भारतीयांनी सहभाग नोंदवला. त्यानंतर अनेक सुधारणावादी चळवळी सुरु झाल्या. स्त्रियांच्या दर्जात सुधारणा घडविण्यासाठी अनेक. समाजसुधारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेकांचे बलिदान आहे. त्यात वेगवेगळया धर्माचे, समाजातील व्यक्तींचा सहभाग आहे. देशातल्या अनेक राज्यांतील नेत्यांच्या योगदानानं देशाला स्वातंत्र्य मिळालं आहे. मात्र या सगळया लढ्यात महिलांच्या संघर्षाकडं फारसं लक्ष देण्यात आलं नाही. त्यांच्या योगदानाची म्हणावी अशी दखल घेण्यात आली नाही.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात महिलांचे योगदान महत्वाचे आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासात त्याचा उल्लेखही आहे. त्या महिलांनी स्वातंत्र्यासाठी आपलं जीवन समर्पित केलं आहे. त्यांचा संघर्ष आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. याचा विचार आपण करायला हवा. त्या महिला शूर आणि निडर होत्या. ज्या महिलांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलं त्यांच्या योगदानाची नोंद आपण घ्यायला हवी. भारतीय स्वातंत्र्याची चळवळ ही महिलांच्या योगदानाच्या उल्लेखाअभावी अपूर्ण आहे.

चले जाव आंदोलनाच्या नायिका म्हणून अरुणा असफअलींकडे पाहिलं जातं. भूमीगत राहून स्वातंत्र्य चळवळीत काम करणाऱ्या अरुणाबाईंच्या क्रांतीच्या निर्धाराला स्वत: महात्मा गांधीही बदलू शकले नाहीत. मात्र, गांधींची भेट घेण्यासाठी अरुणाबाईंनी केलेलं अद्वितीय धाडस इतिहासात नोंदवलं गेलंय. अरुणाबाई विचारानं समाजवादी. चले जाव आंदोलनातील त्यांचे समाजवादी साथी एक एक करून गजाआड होत होते. त्यात जयप्रकाश नारायण यांना गुन्हा मान्य करण्यासाठी बर्फाच्या लादीवर झोपवल्याची बातमी फुटली. संपूर्ण देश हादरला. यावेळी अरुणाबाईंची तर सरकारला खाऊ की गिळू अशी अवस्था झाली होती. पायाला भिंगरी लावून अरुणाबाई तरुणांना चळवळीत आणण्यासाठी फिरत होत्या. हे सर्व भूमीगत कार्य असल्यानं त्यांची तब्येतही ढासळत होती. अरुणाबाईंच्या तब्येतीची काळजी वाटत असल्याचं म्हणत गांधीजींनी त्यांना भेटण्यास बोलावले. या भेटीची जबाबदारी ग. प्र. प्रधान यांच्यावर होती. पुण्याच्या पारसी सॅनिटोरियमच्या मागील बाजूस गांधीजींच्या निवासाची कुटी होती. सॅनिटोरियमचा भाग असल्यानं तिथं फारसा पोलीस बंदोबस्त नव्हता. याचाच फायदा घेत अरुणाबाई तिथं पोहोचल्या.

अरुणाबाई वेशांतर करून तिथं पोहोचल्या होत्या. पारशी महिलेचं वेशांतर अरुणाबाईंनी केलं होतं. गांधींना त्यांची ओळख पटावी म्हणून अरुणाबाईंनी गांधींना भेटल्यावर 'कापडिया' हा सांकेतिक शब्द उचारण्याचं ठरलं होतं. अरुणाबाईंना पाहताच गांधींनी त्यांना घातपाती चळवळ बंद करून पोलिसांच्या स्वाधीन होण्याची विनंती केली. मात्र, त्यावर अरुणाबाई म्हणाल्या, "मी तुमचा अत्यंत आदर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

करते. पण आपले विचार जुळणारे नाहीत. मी क्रांतीवादी आहे आणि क्रांतीवादी म्हणूनच काम करणार. आपल्याला शक्य असल्यास मला आशीर्वाद द्यावा."

आपले रस्ते वेगळे आहेत, हे सांगण्याचे धाडस अरुणाबाईंमध्ये होतं आणि गांधींनी भेटीसाठी बोलावलंय म्हटल्यावर जीवावर बेतणार असल्याचं कळूनही त्यांना भेटण्यासाठी जाण्याचं धाडसही त्यांच्यात होतं. अरुणा असफअली मात्र अखेरपर्यंत इंग्रजांच्या हातात सापडल्या नाहीत. त्यांना पकडून देणाऱ्यास पाच हजारांचं बक्षीस इंग्रजांनी जाहीर केलं होतं. युसुफ मेहरअलींनी अरुणाबाईंबद्दल म्हटलं होतं की, 'झाशीच्या राणी लक्ष्मीबाईनंतर अरुणाताई याच स्वातंत्र्ययुद्धाच्या नायिका होत्या.

राष्ट्रीय विकासात स्वातंत्र्यपूर्व काळात भारत छोडो, सविनय कायदेभंग, स्वदेशी अभियान, असहकार आंदोलन अशा अनेक चळवळींमध्ये महिला अग्रेसर राहिल्या. महिलांचे स्थान उंचावण्यासाठी डॉ. मुठथूलक्ष्मी रेड्डी, डॉ. ॲनी बेझंट, लेडी टाटा, मागरिट काझीन अशा अनेक कर्त्या महिलांनी महिला विकासासाठी तर सरोजिनी नायडू यांनी मानवाधिकारासाठी प्रयत्न केले. १९३७ सालाच्या निवडणुकीत ४१ जागा महिलांना राखीव ठेवल्या.

**राजकीय क्षेत्र (स्वातंत्र्योत्तर काळ)**

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणातील स्त्री नेत्या म्हणून इंदिरा गांधी, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, मायावती, जयललिता, प्रतिभा पाटील, सुषमा स्वराज, शालिनीताई पाटील, सुप्रिया सुळे, शीला दिक्षीत, वसुंधराराजे सिंदिया ही नावे सुपरिचित आहेत. या सर्वांनी स्वच्छतागृहे, बचतगट, महिला सुरक्षितता लिंगनिदान स्त्री-भृणहत्या, स्वच्छता, यांसारख्या प्रश्नांवर शासनाचे वेळोवेळी लक्ष वेधले. शहरांसोबतच गेल्या दहा वर्षांत ग्रामीण भागातही महिला सरपंचांपैकी काहींनी दारूबंदीच्या लढाईलाही मूर्तस्वरूप दिले. ग्रामसभा घेतल्या, दारूबंदीचे ठराव विजयी केले व गावपातळीवर समाज सुधारायचा प्रयत्न केला. महिला आत्मविश्वासाने बोलताहेत, काहीतरी करून दाखवण्याची महिलांमधील जिद्द वाढली आहे. स्त्रीच्या राजकारणातील सहभागाविषयीच्या वाढणाऱ्या प्रतिकूलतेला स्त्रियांनी एक शक्ती बनवण्यात यश मिळवले आहे. स्त्रियांनी राजकारणाविषयी नकारात्मकता न बाळगता, राजकारणात आलं पाहिजे. महिला चळवळीने कात टाकून केवळ समाजकारण न करता राजकीय आरक्षणासाठी लढले पाहिजे. आणि स्त्रियांचं प्रतिनिधित्व करण्यासाठी समाजभान असलेल्या चांगल्या महिला राजकारणात धाडल्या पाहिजेत. महिला राजकीय क्षेत्रात सक्रीय होताहेत हे अत्यंत महत्त्वाचे असुन त्यातून येणारा काळ नक्कीच बदललेला असेल. शेवटी, राजकारणात येऊनच चांगलं समाजकारण करता येतं .

**नागरी क्षेत्र**

आज नागरी क्षेत्रात स्त्रिया अधिकारिणी बनून पुढे आल्या. शिक्षिका ते कलेक्टरपर्यंत, नगरसेविका ते पंतप्रधानापर्यंत विविध क्षेत्रांत स्त्रियांनी मानाच्या जागा आपल्या कुशलतेच्या स्वबळावर पटकावल्या अन् सर्वच पदावर महिला सक्षमतेने कार्यरत आहेत. शासकीय, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात ३० टक्के जागा राखीव असल्यामुळे मिळालेल्या संधीचं सोनं करत कुटुंबाच्या अर्थार्जनासाठी त्या मदत तर करतच आहे, पण देशाच्या प्रगतीत व नवीन पिढी घडवण्यात, त्यांच्यापुढे आदर्श ठेवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आयएएस, आयपीएस होऊन नागरी सेवा करणाऱ्या कितीतरी स्त्रिया आपले कौशल्य देशासाठी अर्पण करीत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आहेत. उदा. नीला सत्यनारायण, लीना मेहेंदळे, चंद्रा अय्यंगार, मीरा बोरवणकर इ. आजच्या काळात पोलीस क्षेत्रातही कितीतरी महिला पोलीस शिपाई ते पोलीस इन्स्पेक्टर, कमिशनर म्हणून कार्यरत आहेत.

**सामाजिक क्षेत्र**

सामाजिक क्षेत्रातही स्वतः सिंधुताई सपकाळ, अपर्णा रामतीर्थकर, साधना आमटे, प्रकाश आमटे, मेधा पाटकर अशा कितीतरी महिलांनी विशेष कामगिरी केली आहे. अलीकडे गावोगावी महिला मंडळे व बचत गटाच्या माध्यमातूनही अनेक कार्ये पार पडली जातात. सामाजिक कार्य करतानाही अनेक महिला कधी श्रमदान, अन्नदान, ज्ञानदान तर कधी आर्थिक मदत करताना दिसतात

**स्वयंरोजगार क्षेत्र**

पूर्वी घरकाम करणे, स्वयंपाकाची कामे करणे, भाजीपाला विकणे इ. कामे करणे कमी प्रतीचं मानलं जायचं, पण सध्या मध्यमवर्गीय कुटुंबातील शिक्षित, अशिक्षित, गरजू स्त्रिया स्वयंपाकाची कामे, मुले सांभाळणे, पाळणाघर चालवणे, मेस चालवणे, भाजी-पोळी केंद्र, हॉटेल व्यवसाय, शिवणकाम करणे, गरजू पेशंटची नर्स म्हणून शुश्रुशा करताना दिसतात. आजमितीला स्त्रिया त्यांचे सुप्त गुण हेरून विकसित करण्यासाठी विविध क्षेत्रांतील मार्गदर्शन घेऊन तर कधी डिजिटल माध्यमांच्या यू ट्यूब, फेसबुक, इन्स्टाग्रामचा आधार घेतात व त्यांच्या बकेट लिस्टमध्ये असणाऱ्या सुप्त इच्छांची स्वप्नपूर्ती करताना दिसतात. ज्या स्त्रिया शिक्षित आहे, परंतु काही कौटुंबिक अडचणींमुळे स्वतःच करियर करू शकल्या नाहीत, अशा स्त्रिया या संधीचं सोनं करत ब्युटी पार्लर टाकणं, ऑनलाईन कपड्यांचा व्यवसाय करणे, गायनाचे क्लास घेणे, चित्रकला, डान्स, स्विमिंग, झुब्बा, योगाचे क्लास, जिम ट्रेनर, ऑर्गेनिक फळभाज्या विकणे, ठिकठिकाणी व्याख्यान म्हणून जाणे व जनजागृती करणे इ. कामे करताना स्त्रिया दिसतात.. आपला पाककृती आस्वाद सर्वांना मिळावा म्हणून काही महिला घरगुती फराळाचे चटपटीत पदार्थ करून विकणे, गर्दीच्या ठिकाणी गाडा लावून गरमागरम चटपटीत पदार्थ स्वतः तयार करून विकणे, घरगुती मिरची मसाले, उन्हाळ्याचे पदार्थ तयार करून विकणे, रसवंती गृह चालवणे, रिक्षा चालवून व्यवसाय करणे, ब्युटी पार्लर चालवणे इ. व्यवसाय करून महिला कुटुंबासाठी अर्थार्जन करताना दिसतात. ढोलपथक, लेझिम, क्रीडा क्षेत्र, योगाक्षेत्र, स्विमिंग, कत्थक इत्यादी क्षेत्रात इतर मुलामुलींना मार्गदर्शन करून अर्थार्जन करताना दिसतात. थोडक्यात स्त्रियांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलंय की वयोगट कुठलाही असो दुर्दम्य इच्छाशक्ती अन् अपार कष्ट करण्याची तयारी असेल तर व्यक्ती आयुष्याच्या कुठल्याही टप्प्यावर यशस्वी होऊन स्वतःला सिद्ध करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा समाजात आदर्श ठेवण्यात पात्र ठरेल.

**महिलांमध्ये झालेले महत्वाचे बदल**

आज स्त्रीच्या वेशात आणि राहणीमानातही खूप जास्त बदल झालाय. तिची भाषाशैली बदललीय. शिक्षणाने विचारांची प्रगल्भता वाढलीय. ज्ञानाने ती समृद्ध झालीय. आत्मविश्वासाने व निर्भयपणे ती सर्वत्र वावरते व आपली मते घरात व समाजाच्या उंबरठ्यावर परखडपणे मांडताना दिसत आहे. काम करताना सुलभ जावं म्हणून तिने गरजेनुसार आपल्या पोशाखात बदल केला आहे. २४ तास साडी चोळीतच न राहता तिने सलवार कुर्ता, पँट शर्ट, वनपिस इ. पोषाखांची निवड केलेली दिसते. स्वतःच्या ‘स्व’बद्दलही ती जास्त जागृत होऊन ती गरजेनुसार आहारात, मानसरोगतज्ज्ञ,स्त्रीरोगतज्ज्ञ, योग शिक्षिका, फिटनेस पाईंट, अथर्ववेद तज्ज्ञ, होमिओपॅथी तज्ज्ञ इ.शी संपर्क करून आपलं शरीर व मन कसं सदृढ आणि निरोगी ठेवता येईल याकडे तिचा कटाक्ष आहे. व्यक्तिमत्त्व कसं जास्तीत जास्त खुलवता येईल त्यासाठी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आवश्यक ती पावले उचलण्यासाठी ती सहभागी होते. स्त्रीविषयक कायदे, स्त्री सुरक्षा मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या व उपलब्ध असलेल्या सर्व सुविधांची माहिती करून घेण्यात ती तरबेज झालीय. स्वरक्षण करता यावं यासाठी कराटेचं मार्गदर्शन, नियमित चालणे व व्यायाम, सदृढ शरीरयष्टी मजबूत ठेवण्याविषयी आजची स्त्री जागृत आहे.

आज स्त्रीने एक सत्य जाणले आहे. आता ती आर्थिकदृष्ठ्या व ज्ञानासाठी कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाही. स्त्री-पुरुष समान आहेत, हे तिच्या कृतीतून तिने सिद्ध केलंय. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणं, लिंगभेद कामाच्या काळात विसरून झोकून देऊन काम करणं, निर्भयपणे घरात आणि समाजात वावरताना निर्णय प्रक्रियेत हिरिरीने सहभागी होणे इ. गोष्टी आजची स्त्री आवर्जून करते. घरात सर्व नाती सांभाळण्यात ती कर्तव्यदक्ष, अपार कष्ट करण्याची तयारी आणि सहनशीलता या त्रिसूत्रीमुळे यशस्वी होतीच, पण स्त्रीला संधी आणि स्वातंत्र्य मिळाल्यामुळे ज्ञान मिळवण्याच्या सर्व सीमा पार करत ती विचारांनी समृद्ध आणि कृतिशील होऊन कर्तव्यदक्ष, अचूक निर्णय क्षमता, अपार कष्ट अन् कायम शिकत राहण्याचा ध्यास इ. गुणांमुळे तिने समाजातील विविध क्षेत्रांत आपलं विशेष नैपुण्य दाखवून यशस्वी कामगिरी करून सर्वांनाच अचंबित करून टाकलंय. दिवसेंदिवस विज्ञानात होणारी प्रगती व बदलत्या तंत्रज्ञानाचा वेध घेत भविष्यातही स्त्रिया अशीच उत्तोरोत्तर प्रगती करून आपला भारत देश जगाच्या पाठीवर उच्च स्थानावर गणला जाण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहतील यात शंका नाही.

**संदर्भ**

1. खोले विलास , धोंडो केशव कर्वे, गंधर्व वेद प्रकाशनसदाशिव पेठ पुणे 30
2. प्रतिभा रानडे श्री प्रश्नांची चर्चा:19 वे शतक , पद्मगंधा प्रकाशन पुणे 38,
3. डॉक्टर सीमा साखरे, श्री वादी चळवळीच्या प्रणेत्या ताराबाई शिंदे, सीमा प्रकाशन रिंग रोड नागपूर 22
4. नानीवडेकर मेधा , महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन पुणे 30
5. भागवत विद्युत,श्री वादी सामाजिक विचार,डायमंड पब्लिकेशन पुणे


Copyright © | JET Network, All Rights Reserved